## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ३० /०५/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जून महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, शुक्रवार, दिनांक ७ जून, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. परिवहन समिती सदस्य पदाच्या रिकाम्या होणा-या सहा जागांवर नामनिर्देशनाद्धारे नियुक्ती करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**ठरावाच्या सूचना :**

**३ ते ५. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिष्ट, यांजकडून :-**

(३) प्र. क्र. ५, कन्हैयानगर भागात चावडीचा बाजुस असलेले मोठा नाला बांधून आजू बाजूच्या राहिलेल्या परिसरात (श्री. श्रवण यादव यांच्या घरासमोरील रिक्त जागेवर ) पेव्हर ब्लॉक व बसण्याकरीता बॅच लावणे. (४) प्र. क्र. ५, कन्हैयानगर भागातील दुर्गामंदिर मागील व उजव्या भागात असलेल्या रिक्त जागेवर प्रभागातील मुलांकरीता मैदान व आजी आजोबा करिता नाना नानी पार्क बनवून मिळावे त्यापूर्वी तेथे अतिक्रमण होऊ नये म्हणून संरक्षण भिंत बांधणे. (५) प्र. क्र. ५, कन्हैयानगर भागात मोठा नाल्यालगत व श्री. श्याम पाल यांच्या घरापासून कदम पार्टी फार्म ब्रिजपर्यंत संरक्षण भिंत बांधून रिक्त असलेल्या जागेवर एफ. आर. पी. (तात्पुरते स्वरुपाचे) शौचालय बांधणे.

**६ व ७. सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडून :-**

(६) प्र. क्र. ८९, करावे मधील मासेमारी करीता जाणा-या मच्छिमारांसाठी टि. एस. चाणक्यच्या जेटीपर्यंत दिवाबत्तीची व्यवस्था करणे. (७) प्र. क्र. ८९, करावे मधील सेक्टर ३६ मधील रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**८ ते १०. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(८) नमुंमपाने स्वत:ची सुरक्षा रक्षक यंत्रणा तयार करणे. (९) नमुंमपामध्ये वास्तूविशारद विभाग सुरु करणे. (१०) नमुंमपाच्या प्रभाग क्र. ६५ मधील सेक्टर-२३, जुईनगर, भुखंड क्र. ९ वरील शौचालय बंद करण्यात येऊन त्या जागी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणे.

**११ व १२. श्री. भरत सहादू नखाते, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. ५२, से. २, मेघदूत सिनेमा व ॲबट हॉटेल यामधील असलेल्या पदपथांचे नुतनीकरण करणे. (१२) प्र. क्र. ५२, से. १ येथील जुने सिडको कार्यालयामधील नागरी आरोग्य केंद्रावरील पहिल्या मजल्यावर असलेल्या रिकाम्या जागेत योगाभ्यास प्रशिक्षण केंद्र (खाजगी संस्थेमार्फत) घेणे.

**१३ ते १५. सौ. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**

(१३) प्र. क्र. ८५, बेलापूर विभागातील दिवाळे येथे जुने मासळी मार्केट तोडून नव्याने विकसित करणे. (१४) प्र. क्र. ८५, सीबीडी, बेलापूर, शहाबाज गावात अंगणवाडी व व्यायामशाळा बांधणे. (१५) प्र. क्र. ८५, मध्ये से. ११ व १५ येथील सीबीडी-बेलापूर, पामबीच मार्गावरील सिग्नल व स्कायवॉक नवीन बांधणे.

**१६ ते १८.श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

(१६) प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागात नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुकूंद कंपनी बस स्टॉप येथे नाना-नानी उद्यान बांधणे. (१७) प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागात नवी मुंबई महानगरपालिकेच्या मार्फत मुकूंद कंपनी जवळ पिण्याच्या पाण्याचे पंप हाऊस आहे तिथे आरोग्य केंद्राची जी + २ इमारत बांधणे. (१८) प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागात नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून अमृतधाम बिल्डींग शेजारी मोकळा भूखंड असून तिथे बहूद्देशिय इमारत (उदा. ग्रंथालय, सभागृह, वाचनालय व व्यायामशाळा.) बांधणे.

**१९ ते २१. सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडून :-**

(१९) केंद्रीय शासनाद्धारे संजय गांधी निराधार योजनेमार्फत विधवा महिलांना रुपये ६००/- पेन्शन रुपाने दिली जाते. परंतू सदर रक्कम कमी असल्याने पालिकेच्या वतीने राबविण्यात येणा-या महिला व बालविकास योजने मार्फत विधवा व निराधार महिलांना पेन्शन रुपाने काही ठराविक रक्कमेची पेन्शन योजना चालू करावी. (२०) अपंग मुली व महिलांकरीता स्वावलंबन जीवन जगता यावे या करिता पालिकेने व्यवसायाकरिता जागा उपलब्ध करुन दयावी अथवा स्टॉल्स उपलब्ध करुन देणे. (२१) महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या भीषण दुष्काळ पडलेला आहे त्या अनुषगांने नागरिकांना आर्थिक संकटाला व महागाईला सामोरे जावे लागत असल्यामुळे महानगरपालिकेने सन २०१३-२०१४ मार्च पर्यतची मालमत्ता करावरील व्याज पुर्णपणे माफ करणे.

**२२ ते २४. सौ. स्वाती अशोक गुरखे, यांजकडून :-**

(२२) प्र. क्र. ८२, सी.बी.डी. महाकाली चौकाचे सुशोभिकरण करणे, सी.बी.डी. विभागात महाकाली चौक हा खऱ्या अर्थाने प्रवेशद्धार असून शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी चौकाची डागडुगी करणे. (२३) प्र. क्र. ८२, से.११, MTNL ते गौतम कॉम्प्लेक्स सोसायटी पर्यंत पदपथ बऱ्याच ठिकाणी तुटलेला व मोडकळीस आलेला आहे. नागरिकांना चालण्यास मोठया प्रमाणावर अडचण होत आहे. सदर पदपथाची दुरुस्ती करुन सुशोभिकरण करणे. (२४) प्र. क्र. ८२, से.११, चावला प्लाजा सोसायटी ते गौतम कॉम्पलेक्स सोसायटी पर्यंत पदपथ नादुरुस्त असून बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. सदर पदपथ दुरुस्त करुन सुशोभिकरण करणे.

**२५. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

प्र. क्र. ७६, नेरुळ, फेज-१ आणि फेज-२ मधील नागरिकांना ये-जा करण्याकरिता नागरिकांच्या मागणीनुसार अंडरपास भुयारी मार्ग तयार करणे.

**२६. श्री. विक्रम धनाजी शिंदे, याचकडून :-**

प्र. क्र. ५१, वाशी मध्ये गेल्या दिड ते दोन वर्षापासून रस्त्यांची अवस्था फार दयनीय झालेली आहे. रस्त्यावरुन वाहन चालविताना होडीमध्ये बसल्यासारखे वाटते. रस्त्यामध्ये खड्डे पडलेले आहेत. खडयात रस्ता आहे की रस्त्यात खड्डा आहे तेच मुळी कळत नाही. याबाबत नागरीकांच्या वारंवार तक्रारी येत असतात. त्यामुळे संबंधित रस्त्यांचे डांबरीकरण लवकरात लवकर करणे.

**२७ ते २९. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

(२७) प्र. क्र. २२, मधील संभाजीनगर येथे शाळेची इमारत नवीन बनविण्यात यावी सदर ठिकाणी २०० च्या जवळपास लहान मुले असून त्यांना शिक्षणाची योग्य सोय नाही. त्यामुळे सदरची मुले शाळेत जात नाहीत तरी या ठिकाणी मुलांना शिक्षण घेता यावे याकरिता येथे शाळेची इमारत बांधणे. (२८) प्र. क्र. २२, संभाजीनगर व अडवली-भुतवली येथे जुने समाजमंदिर मोडकळीस आल्यामुळे त्या समाजमंदिराच्या जागी नवीन समाज मंदिर बांधणे. (२९) प्र. क्र. २२, महापे गांव व अडवली-भुतवली येथे पाण्याचा पुरवठा व्यवस्थित होत नाही तरी जुन्या भुमिगत टाकीची रुंदी वाढवून पाण्याचा साठा वाढविण्यात यावा आणि तो नागरिकांना पंपाद्धारे पोहचविण्यात यावा याकरिता पाण्याची टाकी भुमिगत बांधणे.

**३०. सौ. स्नेहा विकास पालकर, यांजकडून :-**
**"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**३१. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**
**"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**३२. श्री. चंद्रकांत रामदास पाटील(महापे), यांजकडून :-**
**"पाणीपुरवठा व मलनिःस्सारण समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**३३. श्री. प्रभाकर गोमा भोईर, यांजकडून :-**
**"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**३४. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**
**"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**३५. श्री. मधुकर बाबू मुकादम, यांजकडून :-**
**"विधि समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

मा. महापौरांच्या आदेशावरुन,
सही/-
(चित्रा बाविस्कर )
महानगरपालिका सचिव (प्र.),
नवी मुंबई महानगरपालिका.

महापालिका सचिव कार्यालय,
नवी मुंबई महानगरपालिका,
दिनांक ३० मे २०१३.